**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १५४ अन्वये निदेश**

नियोजन मंजुरी दिलेल्या परवानग्या, अनुज्ञप्त्या, नाहरकत प्रमाणपत्रे, बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्रे, भोगवटा प्रमाणपत्रे, प्राधिकरणांकडे जमा करावयाचे शुल्क इ. ची वैधानिक मुदत आपोआप वाढविणे व इतर बाबींबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**नगर विकास विभाग**

**शासन निर्णय क्र. टिपीएस-१८२०/प्र.क्र.५९/२०२०/नवि-१३**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-३२

दिनांक - ४ जून २०२०

**पहा:-** केंद्र शासनाच्या आवासन एवम् शहरी कार्यमंत्रालयाच्या क्र. के१४०११/१२/२०२०/ अमृत-II ए, दि. २८ मे, २०२० (प्रत सोबत)

**निर्णय**

केंद्र शासनाच्या आवासन एवम् शहरी कार्यमंत्रालयाच्या क्र. के-१४०११/१२/२०२०/ अमृत-एए, दि. २८ मे, २०२० अन्वये मार्गदर्शिका (Advisory) प्राप्त झाल्या आहेत. त्याप्रमाणे सध्या देशभर उद्भवलेल्या कोविड-१९ या साथीच्या आजाराच्या (Pandemic) प्रसाराच्या परिस्थितीमुळे दि. २५ मार्च, २०२० पासुन ताळेबंदी (Lockdown) जारी करण्यात आली आहे. त्यामुळे इतर क्षेत्राप्रमाणेच बांधकाम क्षेत्रावर (Real Estate) अनिष्ट परिणाम झालेला आहे. यामुळे बांधकाम क्षेत्राला साहित्य पुरवठा करणारी साखळी बऱ्याच अंशी प्रभावित झाली आहे. तसेच श्रमिक मोठया प्रमाणात स्वग्रामी परतले आहेत / परतण्याच्या वाटेवर (Reverse Migration of Labours) आहेत. अशाने रहिवासी, वाणिज्य, औद्योगिक, संस्थीय बांधकाम प्रकल्पांवर अनिष्ठ परिणाम झाला आहे. अशा परिस्थितीत खालील मुद्दे विचारात घेऊन त्याबाबत उपाययोजना करणे आवश्यक आहे -

१) सद्यस्थितीत उद्भवलेल्या अप्रत्याशित व आपत्कालिन परिस्थितीमुळे निर्माण झालेली असंभवता (Force Majeure) विचारात घेणे आवश्यक वाटते.

२) सर्व संबंधित प्राधिकरणांनी मंजुरी दिलेल्या परवानग्या, अनुज्ञप्त्या, नाहरकत प्रमाणपत्रे, बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्रे, भोगवटा प्रमाणपत्रे, प्राधिकरणांकडे जमा करावयाचे शुल्क इ. ची वैधानिक मुदत आपोआप ९ महिन्यांनी वाढवण्याचा विचार करण्यात यावा.

Scanned with CamScanner

३) त्या अनुषंगाने परवानगी पत्रात नमूद केलेल्या पूर्व अटींची पुर्तता करणेसाठी आपोआपच ९ महिन्यांनी कालावधी वाढवून देणे संयुक्तिक होईल.

४) उक्तानूसार वाढवुन देण्याच्या ९ महिन्यांच्या कालावधीसाठी कोणतेही अतिरिक्त शुल्क अगर व्याज आकारणी करण्यात येऊ नये.

या साऱ्या बाबी विचारात घेता या अनुषंगाने काही उपाययोजना करणे आवश्यक आहे, असे शासनाचे मत झाले आहे. सबब, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम १५४(१) अन्वये शासन खालील प्रमाणे निदेश देत आहे.

## निदेश

प्रस्तुत प्रकरणी सर्व नियोजन प्राधिकरणे / विशेष नियोजन प्राधिकरणे यांनी, केंद्र शासनाच्या आवासन एवम् शहरी कार्यमंत्रालयाच्या क्र. के-१४०११/१२/२०२०/ अमृत-II ए. दि. २८ मे, २०२० अन्वये जारी केलेल्या मार्गदर्शिकेनूसार कार्यपद्धती अनुसरावी, तसेच उक्त नमुद मुद्दा क्र. २, ३ व ४ हे दिनांक २५ मार्च, २०२० रोजी किंवा त्यानंतरच्या टाळेबंदीच्या कालावधीत समाप्त होणा-या वैधानिक कालावधींना लागू राहतील. सदर मार्गदर्शिकेतील मार्गदर्शक तत्वानूसार वाढवुन देण्याच्या ९ महिन्यांच्या कालावधीसाठी कोणतेही अतिरिक्त शुल्क अगर व्याज आकारणी करण्यात येऊ नये.

प्रस्तुत निदेश हे तात्काळ अंमलात येतील.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,**

(श्रीरंग दि. लांडगे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत आवश्यक त्या कार्यवाहीसाठी-**

१. संचालक नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.

२. संचालक नगरपालिका प्रशासन, वरळी, मुंबई.

३. आयुक्त, सर्व महानगरपालिका

४. सर्व सह संचालक नगररचना

५. सर्व विशेष नियोजन प्राधिकरणे,

६. सर्व नगर रचना शाखा कार्यालये

७. मुख्याधिकारी, सर्व नगर परिषदा / नगर पंचायती

Scanned with CamSca